71/6735
Thursday,March 28 ,2024
3:01 PM

# पावती

Original/Duplicate
नोंदणी क्रं. :39म
Regn.:39M

पावती क्रं.: 7261 दिनांक: 28/03/2024

गावाचे नाव: **ठाकुर्ली**

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: **कलन2-6735-2024**

दस्तऐवजाचा प्रकार : **साठेखत**

सादर करणाऱ्याचे नाव: **मे स्वामीनारायण लाईफ स्पेस एलएलपी लिमिटेड लायबलिटी भागीदार संस्था जेराम शामजी पटेल -**

| | |
|---|---|
| नोंदणी फी | रु. 30000.00 |
| दस्त हाताळणी फी | रु. 1520.00 |
| पृष्ठांची संख्या: 76 | |
| एकूण: | रु. 31520.00 |

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे 3:20 PM ह्या वेळेस मिळेल.

Joint Sub Registrar Kalyan 2

सह. दुय्यम निबंधक वर्ग २,
कल्याण क्र. २

बाजार मुल्य: रु.31708036 /-
मोबदला रु.31708036/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 2220000/-

1) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.1520/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 0324282605337 दिनांक: 28/03/2024
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH018319197202324E दिनांक: 28/03/2024
बँकेचे नाव व पत्ता:

मुळ दस्त परत मिळाले.

## CHALLAN
### MTR Form Number-6

| GRN | MH018319197202324E | BARCODE | | Date | 28/03/2024-14:37:07 | Form ID | 25.2 |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** Inspector General Of Registration | | **Payer Details** | |
| **Type of Payment** Stamp Duty<br>Registration Fee | | **TAX ID / TAN (If Any)** | |
| | | **PAN No.(If Applicable)** | ACXFS8846B |
| **Office Name** KLN2_KALYAN 2 JOINT SUB REGISTRAR | | **Full Name** | MS SWAMINARAYAN LIFE SPACE LLP |
| **Location** THANE | | | |
| **Year** 2023-2024 One Time | | **Flat/Block No.** | NEW S.NO.61, OLD S.NO.363, HISSA NO. 19/2 |
| | | **Premises/Building** | AREA 1047 SQ.MTR |
| **Account Head Details** | **Amount In Rs.** | | |
| 0030046401 Stamp Duty | 2220000.00 | **Road/Street** | THAKURLI |
| 0030063301 Registration Fee | 30000.00 | **Area/Locality** | KALYAN THANE |
| | | **Town/City/District** | |
| | | PIN | 4 2 1 2 0 1 |
| | | **Remarks (If Any)** | |
| | | SecondPartyName=KALPANA VISHNU GAIKWAD AND OTHERS~ | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | **Amount In** | Twenty Two Lakh Fifty Thousand Rupees Only |
| **Total** | 22,50,000.00 | **Words** | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Payment Details** BANK OF MAHARASHTRA | | **FOR USE IN RECEIVING BANK** | | |
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 0230004202[illegible] [illegible]4023 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 28/03/[illegible] [illegible] with RBI |
| Name of Bank | | Bank-Branch | | BANK OF MAHARASHTRA |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not [illegible] with Scroll |

Department ID :
Mobile No. : [illegible]70624499

**NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.**
सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 KALYAN-2

क.ल.न.२
दस्त क्र. ६७३४ २०२४
९ ७८



Print Date 28-03-2024 02:39:55

# <u>बाजार मुल्य – २०२४–२०२५</u>

१) गांवाचे नाव – **ठाकुर्ली** ता. कल्याण, सर्व्हे नंबर **३६/३ व इतर**, जमीनीचे क्षेत्र **८७५.५६** चौरस मिटर्स

२) विभाग क्र. – ५/२४

३) जमीनीचे दर – २२,८००/– बांधकाम दर – २६६२०/–

(अ) वास्तुरुपी मोबदला :–

१) निवासी बांधकाम :–

= ३५९.४०x ७३,४०० = २,६४,१५,९००/–

२) वाणिज्य बांधकाम :–

= २५.६६x९१,६०० = २३,५०,४५६/–

३) अनामत रक्कम :–

= ८,७५,४००x६% x६ = ३,१५,१८०/–

४) विना परतवा अनामत रक्कम :– = २६,२६,,५००/–

एकुण १) २,६४,१५,९०० + २) २३,५०,४५६ + ३) ३,१५,१८० + ४) २६,२६,,५००

= <u>३,१७,०८,०३६/–</u>

(ब) बाजारमुल्य :–

= ८७५.५६x२२८०० = <u>१,९९,६२,७६८/–</u>

उपरोक्त 'अ' व 'ब' पैकी जास्तीचे मुल्य हे मोबदला म्हणून विचारात घेणे आवश्यक आहे. म्हणून 'अ' चे मुल्यांकन र.रु. <u>३,१७,०८,०३६/–</u> हे जास्तीचे मुल्य असुन त्यावर र.रु. २२,२० मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे.

THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR CLASS-2 सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कल्याण कार्यालय क्र. २ KALYAN-2

क.ल.न.२
दस्त क्र. ६७३५ | २०२४
२ | ७६

| Department of Stamp & Registration, Maharashtra | | | |
|---|---|---|---|
| Receipt of Document Handling Charges | | | |
| **PRN** | 0324282605337 | **Date** | 28/03/2024 |
| Received from JOINT SUB REGISTER, Mobile number 8600209682, an amount of Rs.1520/-, towards Document Handling Charges for the Document to be registered(iSARITA) in the Sub Registrar office S.R. Kalyan 1 of the District Thane. | | | |
| **Payment Details** | | | |
| **Bank Name** | MAHB | **Date** | 28/03/2024 |
| **Bank CIN** | 10004152024032804984 | **REF No.** | 005559530 |
| This is computer generated receipt, hence no signature is required. | | | |

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2
सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कल्याण
कार्यालय क्र. २
KALYAN-2

| क.ल.न.२ | |
|---|---|
| दस्त क्र. ६७३५ | २०२४ |
| ३ | ७६ |

॥ श्री ॥

जमिनीची मिळकत विकसीत करण्यास देण्यासाठीचा

# साठेकरार / भुविकासकरार

आज दिनांक 28 माहे ...03/२०२४ रोजी लिहून दिला असे

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2
सह दुय्यम निबंधक वर्ग - २ कल्याण
कार्यालय क्र. २
KALYAN-2

क.ल.न.२

| | |
|---|---|
| दस्त क्र. ६७३५ | २०२४ |
| ४ | ७६ |

| | |
|---|---|
| मे. स्वामिनारायण लाईफ स्पेस एलएलपी, | ) लिहून घेणार |
| लिमिटेड लायबलीटी भागीदारी संस्था | ) विकासक |
| संस्थेचा पत्ता–२/५, रत्ना निवास, दुसरा मजला | ) |
| नेहरु रोड, डोंबिवली पुर्व | ) |
| तर्फे भागीदार– | ) |
| **श्री. जेराम शामजी पटेल,** | ) |
| वय ५२ वर्षे, व्यवसाय – व्यापार | ) **प्रथम पक्षीय** |

(सदर साठेकरार/भुविकास करारात यापुढे त्यांना **"प्रथम पक्षीय"** किंवा **"लिहून घेणार/विकासक"** असा उल्लेख केला असून त्यात त्यांचे सक्सेसर्स व अझाईनीज यांचा समावेश आहे)

यांस...

| | |
|---|---|
| १. **श्रीमती कल्पना विष्णु गायकवाड,** | ) लिहुन देणार |
| वय ५१ वर्षे, व्यवसाय – गृहीणी | ) जमिन मालक |
| २. **सौ. रक्षदा नितीन जाधव,** | ) |
| (लग्नापुर्वी रक्षदा विष्णु गायकवाड) | ) |
| वय ३२ वर्षे, व्यवसाय – गृहीणी | ) |
| ३. **सौ. प्रतिक्षा विकास जाधव** | ) |
| (लग्नापुर्वी प्रतिक्षा विष्णु गायकवाड) | ) |
| वय ३० वर्षे, व्यवसाय – गृहीणी | ) |
| ४. **सौ. काजल राहुल कांबळे** | ) |
| (लग्नापुर्वी काजल विष्णु गायकवाड) | ) |
| वय २७ वर्षे, व्यवसाय – गृहीणी | ) |
| ५. **सौ. विशाखा सुमीत उघडे** | ) |
| (लग्नापुर्वी विशाखा विष्णु गायकवाड) | ) |
| वय २[illegible] वर्षे, व्यवसाय – गृहीणी | ) |
| ६. **श्री. हिरजी लक्ष्मण पटेल** | ) |
| वय ६२ वर्षे, व्यवसाय – व्यापार | ) |
| (वरील अ.क्र. १ ते ५ यांचे कुलमुखत्यारी म्हणून) | ) |
| आज रोजी मु. मोठागांव ठाकुर्ली, | ) |
| डोंबिवली (प), ता. कल्याण, जि.ठाणे | ) **दुसरे पक्षीय** |

(सदर साठेकरार/भुविकास करारात यापुढे त्यांना **"दुसरे पक्षीय"** किंवा **"लिहून देणार जमीन मालक"** असा उल्लेख केला असून त्यात त्याचे वालीवारस, प्रतिनीधी, व्यवस्थापक यांचा समावेश आहे)

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II KALYAN-2

| कलन २ | |
|---|---|
| दस्त क्र. ६७३५ | २०२४ |
| ५ | ७६ |

कारणे साठेकरार/भुविकास करार लिहुन देतात तो येणे प्रमाणे :–

तुकडी जिल्हा ठाणे, पोट तुकडी तालुका कल्याण, मौजे ठाकुर्ली येथील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील

| सर्व्हे नंबर | | हिस्सा | क्षेत्र (हे—आ—प्र) | | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| नवीन | जुना | नंबर | लागवडी योग्य | पोट खराबा | (चौ.मी) |
| ६१ | ३६३ | १९/२ | ००.०७.६३ | ००.०२.८४ | १०४७.०० |

वरील कोष्टकात सविस्तरपणे वर्णन केलेल्या सर्व्हे नंबर ६१(३६३),हिस्सा नंबर १९ या मिळकतीकरता मो.र.नं.२७५०/२०२२, दु.र.नं.११०९/२०२२ दिनांक १३/१२/२०२२ अन्वये पोटहिस्सा मोजणी करून आकारफोड पत्रक करणेत आलेले आहे. त्याप्रमाणे तलाठी/गाव कामगाराचे उपयोगाकरता हिस्सा नमूना नं. ११ व १२ व दुरूस्ती गटबुक तयार करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सदर मिळकतीकरता पोटहिस्सा मोजणी अंती सर्व्हे नंबर ६१(३६३),हिस्सा नंबर १९/१ होऊन लागवडी योग्य क्षेत्र ००.२७.३७, पोटखराबा ००.१०.१६ असे एकुण ०.३७.५३ चौ.मी. क्षेत्र श्री. शरद वामन गायकवाड व इतर यांचे लाभात कायम करण्यात आलेले आहे. तसेच ६१(३६३),हिस्सा नंबर १९/२ होऊन लागवडी योग्य क्षेत्र ००.०७.६३, पोटखराबा ००.०२.८४ असे एकुण ०.१०.४७ चौ.मी. क्षेत्र लिहून देणार आणि ७/१२ सदरी दाखल असलेल्या वारसांपैकी श्रीमती मंदा प्रदीप साळवी यांचे लाभात कायम करण्यात आलेले आहे. अशी नोंद सदरहू मिळकतीच्या ७/१२ सदरी व इतर अभिलेखा सदरी दिनांक ०४/०१/२०२३ रोजीच्या **फेरफार क्र. ५१४१** अन्वये दाखल करण्यात आलेली आहे. सदर पोटहिस्सा मोजणी वहिवाटीनुसार व कायदेशीररित्या झालेली आहे व हे लिहून देणार यांना मान्य व कबुल आहे व भविष्यात देखील राहील. अशा वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीस यापुढे “सदरहू संपूर्ण मिळकत” म्हणून संबोधण्यात आले आहे. अशा मिळकतींस चतु:सिमा येणेप्रमाणे:—

**सर्व्हे नं. ६१(३६३)/हिस्सा नंबर १९/२ या मिळकतींच्या चतु:सीमा: —**

| | |
|---|---|
| पूर्वेस | सर्व्हे नंबर ६१(३६३) चा हिस्सा नंबर ५४ व सर्व्हे नंबर ४८(३०) चा हिस्सा नंबर १६ ची मिळकत |
| पश्चिमेस | सर्व्हे नंबर ४८(३०) चा हिस्सा नंबर २ ची मिळकत |
| उत्तरेस | सर्व्हे नंबर ६१(३६३) चा हिस्सा नंबर १९/१ ची मिळकत |
| दक्षिणेस | सर्व्हे नंबर ४८(३०) चा हिस्सा नंबर ३ व १७ ची मिळकत |

JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 KALYAN-2

अशी चतु:सिमापूर्वक मिळकत लिहुन देणार यांच्या वडिलोपार्जीत मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे.

कलन - २
दस्त क्र. ६७३५/२०२४
६ / ७६

<u>**सदरहु संपुर्ण मिळकतीची पार्श्वभुमी/पुर्व इतिहास :—**</u>

सदरहु संपूर्ण मिळकती व इतर मिळकतींसंबंधी मुंबई सरकारचा ठरावा नं.५८६९—४५—७ दिनांक १७/०५/१९५० अन्वये कल्याण तालुक्यातील निरनिराळया जमीनीच्या क्षेत्रात स्टॅंडर्ड

एरीया लागु करण्यात आला आहे व अशी नोंद सदरहु संपुर्ण मिळकतीच्या ७/१२ सदरी दिनांक ०२/११/१९५३ रोजीच्या **फेरफार नं. १३३४** अन्वये दाखल करण्यात आली आहे.

सदरहु संपूर्ण मिळकतीचे पुर्वगामी हक्कदार **श्री चऱ्या बारक्या महार** हे मयत झाल्यामुळे त्यांचे मृत्युपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणुनः—

| अ.क्र. | नांव | नात |
|---|---|---|
| १. | रामा नाना महार | नातू |
| २. | कचऱ्या काळया महार | — ॥ — |

यांची नांवे वारस म्हणून सदरहू मिळकतीच्या ७/१२ उताऱ्या सदरी व इतर महसुल अधिकार अभिलेखा सदरी दिनांक २६/०२/१९५६ रोजीच्या **फेरफार क्र. १४२५** अन्वये दाखल करण्यात आली होती.

सदरहु संपूर्ण मिळकतींबाबतचे पुर्वगामी हक्कदार रामा नाना महार हे दिनांक १६/०३/१९९१ रोजी मयत झाल्यामुळे त्यांचे मृत्युपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणुन

| अ.क्र. | नांव | नात |
|---|---|---|
| १. | प्रभावती रामा महार | पत्नी |
| २. | भारद्वाज रामा महार | मुलगा |
| ३. | प्रिया रामा महार | मुलगी |
| ४. | राजश्री रामा महार | मुलगा |
| ५. | गौतम रामा महार | — ॥ — |
| ६. | दिनकर रामा महार | — ॥ — |
| ७. | संगिता रामा महार | मुलगी |

यांची नांवे वारस म्हणून सदरहू मिळकतीच्या ७/१२ उताऱ्या सदरी व इतर महसुल अधिकार अभिलेखा सदरी दिनांक १३/१२/१९९३ रोजीच्या **फेरफार क्र. ४४३६** अन्वये दाखल करण्यात आली होती.

तसेच सदरहू संपुर्ण मिळकतीबाबतचे पुर्वगामी हक्कदार **श्री कचरू उर्फ कचऱ्या काळया गायकवाड** हे दिनांक ०२/०३/१९९१ रोजी मयत झाल्यामुळे त्यांचे मृत्युपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणुन :—

| अ.क्र. | नांव | नात |
|---|---|---|
| १. | [illegible] काळया गायकवाड | भाऊ |
| २. | कृष्णा कचरू उर्फ कचऱ्या गायकवाड | मुलगा |
| ३. | आशाबाई रामा जाधव | मुलगी |
| ४. | [illegible]बाई गौतम जाधव | — ॥ — |

क.ल.न. २
दस्त क्र. ६८३५/२०२४
७

वरील वारसां पैकी **कृष्णा कचरू उर्फ कचऱ्या गायकवाड** (मुलगा) दिनांक ११/११/१९९६ रोजी मयत झाल्यामुळे त्यांचे मृत्युपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणुनः–

| अ.क्र. | नांव | नात |
|---|---|---|
| १. | मुक्ताबाई कृष्णा गायकवाड | पत्नी |
| २. | प्रियांका कृष्णा गायकवाड | मुलगी |
| ३. | पुजा कृष्णा गायकवाड | — ॥ — |
| ४. | सागर कृष्णा गायकवाड | मुलगा |
| ५. | उज्वला कृष्णा गायकवाड | मुलगी |

यांची नांवे वारस म्हणून सदरहू मिळकतीच्या ७/१२ उताऱ्या सदरी व इतर महसुल अधिकार अभिलेखा सदरी दिनांक २९/०४/१९९९ रोजीच्या **फेरफार क्र. ४४९६** अन्वये दाखल करण्यात आली होती.

तसेच सदरहु संपूर्ण मिळकतीबाबत वरील **फेरफार नं. ४४९६** अन्वये दाखल झालेल्या वारसांपैकी **वामन काळया गायकवाड** हे दिनांक २२/०५/२००० रोजी मयत झाल्यामुळे त्यांचे मृत्युपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणुनः–

| अ.क्र. | नांव | नात |
|---|---|---|
| १. | बेबी वामन गायकवाड (मयत) | पत्नी |
| २. | भगवान वामन गायकवाड | मुलगा |
| ३. | विष्णू वामन गायकवाड | — ॥ — |
| ४. | पार्वती राजेश जाधव | मुलगी |
| ५. | भरत वामन गायकवाड | मुलगा |
| ६. | शरद वामन गायकवाड | — ॥ — |
| ७. | मंदा प्रदीप साळवी | मुलगी |
| ८. | जयदेव वामन गायकवाड | मुलगा |

यांची नांवे वारस म्हणून सदरहू मिळकतींच्या ७/१२ उताऱ्या सदरी व इतर महसुल अधिकार अभिलेखा सदरी दिनांक ०९/०८/२००० रोजीच्या **फेरफार क्र. ४५११** अन्वये दाखल करण्यात आली.

तालुका आदेशाने सदरहु संपूर्ण मिळकतीबाबत उपजिल्हाधिकारी (अपिल) ठाणे यांचेकडील अपिल क्र. आरटीएस/अपिल/११७/०२, ११८/०२ बाबत दिनांक २१/०३/२००३ रोजी अपिल निर्णय होवुन त्याप्रमाणे अपिल मान्य करण्यात येवुन मा. उपविभागिय अधिकारी ठाणे विभाग ठाणे यांचेकडील आदेश क्र. आरटीएस/अपिल/३७/२००२ व ४१/२००२ दिनांक १८/०९/२००२ रोजीचा आदेश रद्द करण्यात आला व त्या अनुषंगाने नोंदविण्यात आलेला वरील फेरफार क्र. ४५३८ ची नोंद रद्द करण्यात आली करण्यात आली आहे व अशी नोंद मा. उपजिल्हाधिकारी (अपिले), ठाणे यांचेकडील आदेश क्र. ११७/०२ व ११८/०२ दिनांक

२१/०३/२००३ तसेच अतिरीक्त आयुक्त कोकण विभाग यांचेकडील अपिल/ इंडेक्स/ आरटीएस/आरईव्ही/२२/०३ दिनांक १२/१२/२००४ लगत तालुका हुकुम नं. आरटीएस/ टे–१०/कावि/२००३/१९९६/१० दिनांक ०४/०३/२००४ चा हुकुम झाल्यावरून वामन काळया यांची वारस म्हणुन नोंद तसेच त्यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या वारसांची दाखल झालेली नोंद कायम केली व सदरची नोंद सदरहू मिळकतींच्या ७/१२ सदरी व इतर महसुल अधिकार अभिलेखा सदरी दिनांक ०९/०३/२००५ रोजीच्या **फेरफार क्र. ४५५०** अन्वये दाखल करण्यात आली.

वर नमुद केल्याप्रमाणे सदरहु संपूर्ण मिळकतीतील वारसदार व सहहिस्सेदार १. प्रभावती रामा महार, २. दिनकर रामा महार, ३. भारद्वाज रामा महार, ४. प्रिया रामा महार, ५. गौतम रामा महार, ६. संगिता रामा महार, ७. राजश्री चिंतामण पवार यांनी सदरहु संपुर्ण मिळकतीतील त्यांचे सर्व अविभक्त मालकी हक्क व हीतसंबंध १. श्री विष्णु वामन गायकवाड, २. श्री भगवान वामन गायकवाड, ३. श्री भरत वामन गायकवाड, ४. श्री शरद वामन गायकवाड व ५. श्री जयदेव वामन गायकवाड यांचे लाभात दिनांक ०७/०८/२०१० रोजीच्या हक्कसोडपत्रान्वये कायमस्वरूपी समप्रमाणात सोडुन दिला आहे व असे हक्कसोडपत्र मे. दुय्यम निबंधक साहेब, कल्याण–३ यांचे कार्यालयात दस्त क्र. ५२३०/२०१० अन्वये नोंदविण्यात आले आहे व अशा नोंदणीकृत हक्कसोडपत्राच्या अनुषंगाने सदर हक्क सोडणाऱ्या व्यक्तींची नावे सदरहु संपुर्ण मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावरून **फेरफार नं. ४७३९** अन्वये कमी करण्यात आली.

तसेच वर नमुद केल्याप्रमाणे सदरहु संपुर्ण मिळकतीतील वारसदार व सहहिस्सेदार १. मुक्ताबाई कृष्णा गायकवाड, २. पुजा कृष्णा गायकवाड, ३. सागर कृष्णा गायकवाड, ४. उज्वला कृष्णा गायकवाड, ५. आशाबाई रामा जाधव, ६. उषाबाई उर्फ सुशिला गौतम जाधव यांनी सदरहु संपुर्ण मिळकतीतील त्यांचे सर्व अविभक्त मालकी हक्क व हीतसंबंध १. श्री. विष्णु वामन गायकवाड, २. श्री भगवान वामन गायकवाड, ३. श्री भरत वामन गायकवाड, ४. श्री शरद वामन गायकवाड व ५. श्री जयदेव वामन गायकवाड यांचे लाभात दि.०४/०२/२०१३ रोजीच्या हक्कसोडपत्रान्वये कायमस्वरूपी समप्रमाणात सोडुन दिला आहे व असे हक्कसोडपत्र मे. दुय्यम निबंधक साहेब, कल्याण–५ यांचे कार्यालयात दसत क्र. १८८०/२०१३ अन्वये नोंदविण्यात आले आहे व अशा नोंदणीकृत हक्कसोडपत्राच्या अनुषंगाने सदर हक्क सोडणाऱ्या व्यक्तींची नांवे सदरहु संपुर्ण मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावरून **फेरफार नं. ४७७१** अन्वये कमी करण्यात आली आहेत.

मा. उपविभागीय अधिकारी कल्याण उपविभाग कल्याण यांचेकडील आदेश क्र. के.डी./ दे– ७/हक्कनोंद/नविनशर्त/कावी/–५६५६/१७ दिनांक ०४/१२/२०१७ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार ७/१२ सदरी अमल घेण कामी आदेशान्वये हस्तदोषामुळे दाखल झालेली नवीनशर्त “भागवटादार वर्ग २” ही नोंद कमी करून खालसा “भागवटादार वर्ग १” केली अशी नोंद सदरहू मिळकतींपैकी सर्व्हे नंबर ६१/१९/२ व ६१/२२ या मिळकतींच्या ७/१२ सदरी व इतर महसुल अधिकार अभिलेखा सदरी दिनांक ३१/०३/२०१८ रोजीच्या **फेरफार क्र. ४९१६** अन्वये दाखल करण्यात आलेली आहे.

सदरहु मिळकतींच्या ७/१२ सदरी दाखल असलेल्या वारसांपैकी विष्णु वामन गायकवाड हे दिनांक ३१/१२/२०२० रोजी मयत झाले असून त्यांचे मृत्युपश्चात त्यांना कायदेशीर वारस म्हणून १. श्रीमती कल्पना विष्णु गायकवाड, २. सौ. रक्षदा नितीन जाधव, ३. सौ. काजल राहुल कांबळे, ४. सौ. प्रतिक्षा विकास जाधव व ५. सौ. विशाखा सुमीत उघडे हे वारस आहेत सदर वारसांची नोंद सदरहू मिळकतींच्या ७/१२ सदरी व इतर महसुल अधिकार अभिलेखा सदरी दिनांक ०९/०६/२०२१ रोजीच्या **फेरफार क्र. ५०४९** अन्वये दाखल करण्यात आलेली आहे.

सदरहु मिळकतींच्या ७/१२ सदरी दाखल असलेल्या वारसांपैकी बेबी वामन गायकवाड या दिनांक १५/०३/२०११ रोजी मयत आहेत. तरी ७/१२ सदरी व इतर महसुल अधिकार अभिलेखा सदरी दाखल असलेली त्यांच्या नावाची नोंद दिनांक ०१/११/२०२२ रोजीच्या **फेरफार क्र. ५१२८** अन्वये कमी करण्यात आलेली आहे.

आदेशाने जुना ७/१२ म्हणजेच सर्व्हे नंबर ६१/१९ बंद व नविन पोटहिस्सा मोजणी करून सक्षम अधिकारी तहसिलदार यांनी त्यांचेकडील आदेश क्र. हक्कनोंद—१/टे—१० कावि२६५७/२०२२—२०२३ दिनांक २३/१२/२०२२ अन्वये आकरफोड आदेश झाल्याने मुळ ७/१२ बंद करून नविन पोट हिस्से तयार केले ते येणेप्रमाणे:—

सर्व्हे नंबर ६१(३६३),हिस्सा नंबर १९/१ होऊन लागवडी योग्य क्षेत्र ००.२७.३७, पोटखराबा ००.१०.१६ असे एकुण ०.३७.५३ चौ.मी. क्षेत्र खाता क्र. ६८७ कायम करण्यात आलेले आहे.

व सर्व्हे नंबर ६१(३६३),हिस्सा नंबर १९/२ होऊन लागवडी योग्य क्षेत्र ००.०७.६३, पोटखराबा ००.०२.८४ असे एकुण ०.१०.४७ चौ.मी. क्षेत्र खाता क्र. ६८८ अन्वये धारक १. मंदा प्रदीप साळवी, २. श्रीमती कल्पना विष्णु गायकवाड, ३. सौ. रक्षदा नितीन जाधव, ४. सौ. काजल राहुल कांबळे, ५. सौ. प्रतिक्षा विकास जाधव व ६. सौ. विशाखा सुमीत उघडे यांचे लाभात कायम करण्यात आलेले आहे. नोंद सदरहू मिळकतींच्या ७/१२ सदरी व इतर महसुल अधिकार अभिलेखा सदरी दिनांक ०४/०१/२०२३ रोजीच्या **फेरफार क्र. ५१४१** अन्वये दाखल करण्यात आलेली आहे. सदर पोटहिस्सा मोजणी वहिवाटीनुसार व कायदेशीररित्या झालेली आहे त्याअनुषंगाने सदर मिळकतीवर विकास आराखडा मंजूर केलेला विकसन कार्य राबविण्यात येत आहे व हे लिहून देणार यांना मान्य व कबूल आहे व भविष्यात देखील राहील.

अशा प्रकारे सर्व्हे नंबर ६१, हिस्सा नंबर १९ या मिळकतीची पोटहिस्सा मोजणी अंती सर्व्हे नंबर ६१, हिस्सा नंबर १९/२ होवून लिहून देणार तसेच मंदा प्रदीप साळवी यांच्या लाभात एकुण १०४७.०० चौ.मी. क्षेत्र येत आहे. अनुषंगाने लिहून देणार तसेच मंदा प्रदीप साळवी यांच्या हिश्यास आलेले क्षेत्र येणे प्रमाणे:—

| | |
|---|---|
| क.ल.न.२ | |
| दस्त क्र. ६७३५ | २०२४ |
| १० | ७८ |

| अ.क्र. | नांव | मालकी हिस्सा |
|---|---|---|
| १. | लिहून देणार | ८७५.५६ |
| २. | मंदा प्रदीप साळवी | १७१.४४ |
| | एकुण क्षेत्र ........ | १०४७.०० |

अशा प्रकारे सदरहु संपुर्ण मिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी लिहुन देणार यांचा अविभक्त यांच्या हिश्याच्या म्हणजेच ८७५.५६चौ.मी. क्षेत्राचा उल्लेख "सदरहु मिळकत" असा करण्यात आला आहे व सदरचे ८७५.५६चौ.मी. हे प्रस्तुत साठेकराराचा मुळ विषय आहे.

लिहुन देणारया कै. विष्णु वामन गायकवाड यांचे कुटुंबातील वारस/व्यक्ती आहेत. सदर वारसांना प्रस्तुत व्यवहाराची जाणीव आहे म्हणुन तसेच भविष्यात सदरहु मिळकतीच्या वारसा हक्कांबाबत कोणतीही उणीव राहु नये व वाद निर्माण होवु नये म्हणुन त्यांना प्रस्तुत करारात मालक म्हणुन सामील करण्यात आले असून त्यांनी वारस/व्यक्ती म्हणून प्रस्तुत करारावर सही केलेली आहे.

सद्यस्थीतीत लिहून देणार मालक यांना त्यांच्या मिळकतीची वैयक्तिकरित्या निगा राखणे व सदरहू मिळकत अतिक्रमणा पासुन संरक्षीत ठेवणे शक्य नसल्यामुळे सदरहू मिळकत विकल्यास वा विकसित केल्यास त्या अनुषंगाने मिळणारा मोबदला हा कुटुंबाच्या उन्नतीकरीता व भल्याकरीता वापरता येईल. त्याच प्रमाणे मिळणाऱ्या मोबदल्यातून वाढत्या कुटूंबाची योग्य ती सोय करता येईल, या व इतर अनुषंगीक कारणांमुळे लिहून देणार मालक यांनी सदरहू मिळकत भावी विकासकांना विकत/विकसित करण्यास देण्याचे ठरविले.

लिहून देणार यांच्या वरील विधानांवर विसंबून राहून लिहून घेणार यांनी सदरहु मिळकतीबाबतचा व्यवहार मान्य करून त्यानुसार दोन्ही पक्षकारांत झालेल्या चर्चेनुसार सदरहू मिळकत देण्या–घेण्याबाबत खालीलप्रमाणे ठराव झाला आहे तो येणेप्रमाणे:—

लिहून देणार यांच्या अविभक्त मालकी हिश्याकरता म्हणजेच **८७५.५६चौ.मी.** क्षेत्राकरता लिहून देणार यांना वि[illegible] रक्कमेस्वरूपी मोबदला म्हणून रक्कम रू. ३,००,०००/— (अक्षरी रूपये तिन लाख मात्र) प्रति गुंठा या प्रमाणे होणारी एकुण रक्कम देण्याचा प्रस्ताव दिला.

तसेच सदरहु मिळकतीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडुन एफएसआय (मुळ एफएसआय) प्रमाणे जेवढे रहीवासी (Residential) प्रकाराचे बांधकाम क्षेत्र मंजूर होईल त्यापैकी एकुण ८४७१चौ.फुट सेलेबल बांधकाम क्षेत्र लिहुन देणार यांना देण्याचे ठरलेले आहे, त्यापैकी ७१८८चौ.फुट सेलेबल रहीवासी स्वरूपाचे (Residential) बांधकाम क्षेत्र म्हणजेच वजा ३५टक्के लोडींग प्रमाणे ३५९.४० चौ.मी. म्युनिसीपल बिल्ट—अप निवासी बांधकाम क्षेत्र व १२८३चौ.फुट सेलेबल वाणीज्य (Commertial) स्वरूपाचे बांधकाम क्षेत्र म्हणजेच वजा ५०टक्के लोडींग प्रमाणे २५.६६चौ.मी. वाणीज्य स्वरूपाचे म्युनिसीपल बिल्ट—अप बांधकाम क्षेत्र वास्तुविशारदाने दिलेल्या प्रमाणपत्राप्रमाणे देण्यात येईल व त्या

अनुषंगाने लिहुन देणार यांना देय असलेल्या सदनिकांच्या अंतर्गत क्षेत्रामध्ये बाल्कनी, कपाट, फ्लावरबेड, ओपन टेरेस क्षेत्रांचा समावेश आहे व राहील. परंतु कोणत्याही/कुठल्याही प्रकार नैसर्गिक आपत्ती आल्यास अथवा सरकारी नियमा नुसार कुठल्याही/कोणत्याही स्वरूपाची बंदी आल्यास सदरचा कालावधी वाढवण्यात येईल हे लिहून देणार मालक व लिहून घेणार विकासक यांना मान्य व कबूल आहे.

उभय पक्षात असेही ठरले आहे की, वर वर्णन केलेला मोबदला हा लिहुन देणार यांना कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि/अथवा राज्य सरकारने किंवा म्हाडा किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निर्देशित केलेल्या नगर रचना विभाग यांचे नियमा अंतर्गत एफएसआय–१.१० प्रमाणे ग्राहय धरून दिलेला आहे.

तसेच व्यवहाराच्या सुरक्षीततेसाठी परत बोलीच्या तत्वावर बीनव्याजी अनामत (Refundable Security Deposit) रक्कम रू. १,००,०००/– (अक्षरी रूपये एक लाख मात्र) प्रती गुंठया याप्रमाणे होणारी एकुण रक्कम देण्याचा प्रस्ताव दिला.

लिहून घेणार यांचा वरील प्रस्ताव योग्य व रास्त असल्याची लिहून देणार यांची खात्री पटल्यावर त्यांनी सदरहू मिळकत लिहून घेणार यांना विकसीत करण्याकरीता देण्याचे मान्य व कबूल केले आहे तसेच सदरहू मिळकत लिहून घेणार यांना योग्यरित्या विकसित करता यावी व विकसित झाल्यावर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या इमारतींतील गाळे आणि/अथवा सदनिका धारकांनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे किंवा लिहून घेणार किंवा ते सांगतिल त्या व्यक्ती/संस्थेच्या लाभात सदरहू मिळकत व इमारतीचे फरोक्तखत होण्यासाठी लिहून देणार यांचे सर्व हक्क हितसंबंध लिहून घेणार यांच्या लाभात प्राप्त व्हावेत म्हणुन ते सदरहू करारात सामिल झाले आहेत व त्या अनुषंगाने सदर पक्षकार सदरचा करार करीत आहेत त्या कराराच्या अटी व शर्ती येणेप्रमाणे:–

१. लिहून देणार यांच्या अविभक्त मालकी हिश्याकरता म्हणजेच ८७५.५६**चौ.मी.** क्षेत्राकरता विनापरतावा रक्कमेस्वरूपी मोबदला म्हणून प्रती गुंठा रू. ३,००,०००/– (अक्षरी रूपये तीन लाख मात्र) याप्रमाणे ८.७५५गुंठया करता होणारी एकुण रक्कम रू. २६,२६,५००/– (अक्षरी रूपये सव्वीस लाख सव्वीस हजार पाचशे मात्र) लिहून देणार यांना दिलेली आहे.

२. तसेच सदरहू मिळकतीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडुन एफएसआय (मुळ एफएसआय) प्रमाणे जेवढे रहीवासी (Residential) स्वरूपाचे बांधकाम क्षेत्र मंजूर होईल त्यापैकी एकुण ८४७१चौ.फुट सेलेबल बांधकाम क्षेत्र लिहून देणार यांना देण्याचे ठरलेले आहे त्यापैकी ७१८८चौ.फुट सेलेबल रहीवासी स्वरूपाचे (Residential) बांधकाम क्षेत्र म्हणजेच वजा ३५टक्के लोडींग प्रमाणे ३५९.४९ चौ.मी. म्युनिसीपल बिल्ट–अप निवासी बांधकाम क्षेत्र व १२८३चौ.फुट सेलेबल वाणिज्य (Commertial) स्वरूपाचे बांधकाम क्षेत्र म्हणजेच वजा ५०टक्के लोडींग प्रमाणे २५.६६ चौ.मी. वाणिज्य स्वरूपाचे म्युनिसीपल बिल्ट–अप बांधकाम क्षेत्र वास्तुविशारदाने दिलेल्या प्रमाणपत्राप्रमाणे देण्यात येईल व त्याअनुषंगाने लिहून देणार यांना देय असलेल्या सदनिकांच्या अंतर्गत क्षेत्रामध्ये बाल्कनी, कपाट, फ्लावरबेड, ओपन टेरेस क्षेत्रांचा समावेश आहे व राहील.

THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II
क. ल. न. २
दस्त क्र. ६७३५ २०२४
९२ ७८

परंतु कोणत्याही/कुठल्याही प्रकार नैसर्गिक आपत्ती आल्यास अथवा सरकारी नियमा नुसार कुठल्याही/कोणत्याही स्वरूपाची बंदी आल्यास सदरचा कालावधी वाढवण्यात येईल हे लिहून देणार मालक व लिहून घेणार विकासक यांना मान्य व कबूल आहे.

उभय पक्षात असेही ठरले आहे की, वर वर्णन केलेला मोबदला हा लिहुन देणार यांना कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि/अथवा राज्य सरकारने किंवा म्हाडा किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निर्देशित केलेल्या नगर रचना विभाग यांचे नियमा अंतर्गत एफएसआय१.१० प्रमाणे ग्राहय धरून दिलेला आहे

३. तसेच लिहून देणार यांना व्यवहाराच्या सुरक्षीततेसाठी परत बोलीच्या तत्वावर बीनव्याजी अनामत (Refundable Security Deposit) रक्कम रू. १,००,०००/— (अक्षरी रूपये एक लाख मात्र) प्रती गुंठा याप्रमाणे ८.७५५गुठयांकरता होणारी एकुण रक्कम रू ८,७५,५००/— (अक्षरी रूपये आठ लाख पंच्यात्तर हजार पाचशे मात्र) लिहून देणार यांना दिलेली आहे व हे लिहून देणार यांना मान्य व कबुल आहे.

४. वर वर्णन केलेल्या मोबदल्यापैकी रक्कम रू. १०,००,०००/— (अक्षरी रूपये दहा लाख मात्र) कै. विष्णु वामन गायकवाड यांना यापूर्वीच दिलेले आहेत हे लिहून देणार व इतर यांना मन्य व कबुल आहे व भविष्यात देखील राहील व अशी रक्कम लिहून देणार व इतर यांना देय असलेल्या एकुण मोबदल्या मधुन प्रमाणशीरपणे वजावट/वळती करून देण्याचे लिहून देणार यांनी मान्य व कबूल केलेले आहे.

५. उभय पक्षांत असे ठरले आहे की, वर नमुद केलेला रकमेस्वरूपी मोबदला व परतावा सुरक्षा अनामत रक्कम ही सदरहु मिळकतीच्या आजच्या ७/१२ उताऱ्याच्या क्षेत्रानुसार ठरविलेली आहे परंतु सदरहु मिळकतीची मोजणी झाल्यानंतर चे क्षेत्र कमी भरल्यास त्याप्रमाणे अथवा जास्त भरल्यास ७/१२ उताऱ्यावरील क्षेत्रफळ ग्राहय धरण्यात येईल.

६. लिहून देणार असे जाहिर व उद्घोषीत करतात की, लिहुन देणार यांनी सदरहु मिळकतींपैकी काही मिळकतींना तात्पुरती वाडेभिंत/कंपाऊड (Boundry) घालुन दिलेली आहे व उर्वरित मिळकतींना वाडेभिंत/कंपाऊड (Boundry) घालुन देणे बाकी आहे तसेच सदरहु मिळकतींची TILR प्रमाणे हद्द कायम मोजणी करणे देखील बाकी आहे व तसे करण्यास लिहून देणार असमर्थ ठरल्यास अथवा लिहून देणार यांनी मोजणी करतेवेळेस काही हरकती उपस्थित केल्यास लिहून देणार यांना देय असलेल्या वस्तुस्वरूपी/रक्कमेस्वरूपी माबदल्या मधुन असे झालेले नुकसान वजावट/वळती करण्यात येईल व हे लिहुन देणार यांना मान्य व कबुल आहे व राहील.

७. सदरहु मिळकतींपैकी सर्व्हे नंबर ६१/१९ करता ज्याप्रकारे पोटहिस्सा मोजणी करण्यात आली व त्यानुसार पोटहिस्से करून सर्व्हे नंबर ६१/१९/१ व ६१/१९/२ करण्यात आले त्यापध्दतीने लिहून देणार यांच्या इतर मिळकती जर भविष्यात लिहून देणार यांच्या लाभात प्राप्त झाल्यास तर त्याचा ताबा याच करारान्वये लिहून घेणार यांना देत

क.ल.न.२
दस्त क्र. ६७३४/२०२४
१३

आहेत. तसेच भविष्यात जर उर्वरित सर्व्हे नंबर करता पोटहिस्सा मोजणी करण्यात आली तर पोटहिस्सा मोजणी करून जे क्षेत्र श्री. शरद वामन गायकवाड व इतर यांच्या लाभात कायम करण्यात आले आहे त्या क्षत्राच्या लगतचे क्षेत्र लिहून देणार हे लिहून घेणार विकासक यांना विकसन कार्य राबविण्याकरता देणार आहेत व हे लिहून देणार यांना मान्य व कबुल आहे व भविष्यात देखील राहील.

८. उभय पक्षांत असे ठरले आहे की, लिहुन देणार यांच्या मिळकतीबरोबर लिहुन घेणार हे आजुबाजुच्या इतर मिळकतीही संपादन करणार आहेत व अशा सर्व मिळकती एकत्रीत करुन लिहुन घेणार हे मोठया स्वरुपात गृहप्रकल्प राबविणार आहेत व अशा गृहप्रकल्पात वर निश्चित केलेला रहीवासी सदनिकांच्या स्वरुपातील वास्तुस्वरुपी मोबदला देण्यात येणार आहे व अशा वास्तुस्वरुपी मोबदल्या अंतर्गत देण्यात येणाऱ्या सदनिका व इमारत लिहुन देणार यांच्या सदरहू मिळकतीवर असेल अशी संपुर्ण शाश्वती लिहुन घेणार हे लिहुन देणार यांना देऊ शकत नाहीत परंतु लिहुन देणार यांना प्राप्त होणारा वास्तुस्वरुपी मोबदला सदरहू एकत्रीत विकसित होणाऱ्या गृहप्रकल्पाअंतर्गत असेल व तो अशा गृहप्रकल्पातील प्रत्येक फेज मध्ये लिहून देणार यांच्या मिळकतीच्या एकूण क्षेत्राप्रमाणे प्राप्त होणाऱ्या एफएसआयच्या प्रमाणात प्रत्येक इमारतीत प्रत्येक मजल्यावर प्रमाणशीर देण्यात येईल याची संपुर्ण माहीती, जाणीव व खात्री लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना दिली आहे. उभय पक्षात असेही ठरले आहे की, वास्तुस्वरुपी मोबदल्याचे वितरण करतेवेळी उभय पक्षी हे संपुर्ण गृहप्रकल्प योजना लक्षात घेता उभय पक्षीय टप्प्या टप्प्याने वास्तुस्वरुपी मोबदल्याचे वितरण निश्चित करतील. उभय पक्षात असे ठरले आहे की, सदरहू मिळकत आणि/अथवा लगतची मिळकत एकत्रीत करुन त्यावर एकत्रीत बांधकाम मंजुर करुन बांधकाम मंजुरी मिळाल्यावर लिहून घेणार हे लिहून देणार यांना वर ठरलेल्या वास्तुस्वरुपी मोबदल्याच्या वितरणा संबंधी पुरवणी करार करतील व त्यात इमारत क्रमांक, सदनिका क्रमांक, मजला व क्षेत्र नमुद करण्यात येईल.

९. उभय पक्षांत असे ठरले आहे की, वास्तुस्वरुपी मोबदल्या अंतर्गत देण्यात येणाऱ्या सदनिकामधील प्रत्यक फ्लॅट मध्ये सारख्याच सुविधा असतील म्हणजेच लिहुन देणार जमिन मालक यांना देण्यात येणारा मोबदला व लिहुन घेणार विकासक यांच्या हिश्यास आलेल्या सदनिका यामधिल सुविधांमध्ये साम्य असेल हे उभय पक्षीय यांच्यात ठरलेले आहे.

१०. वर नमुद केल्याप्रमाणे लिहून देणार यांना देण्यात येणाऱ्या/प्राप्त होणाऱ्या वास्तुस्वरुपी मोबदल्याचा ताबा सदरहू साठेकरार नोंदणीकृत झाल्या नंतर [illegible] वर्षांच्या कालावधीत टप्प्या टप्प्याने देण्याचा आहे. परंतु मिळकतीच्या टायटल संबंधीचा "वाद" निर्माण झाल्यास, मिळकती संबंधी कोर्ट स्थगीती मिळाल्यास आणि अथवा नैसर्गिक आपत्ती, अपरिहार्य कारणामुळे तसेच बांधकाम साहीत्य व मजुरांची बाजारात [illegible] उत्पन्न झाल्यास सदरहु कालावधी परिस्थीतीप्रमाणे वाढविण्यात येईल. तसेच मिळकतीची टि.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 KALYAN-2

क.ल.न. २

| | |
|---|---|
| दस्त क्र. ६७३५ | २०२४ |
| १४ | ७६ |

आय.एल.आर. मार्फत मोजणी मापणी करुन घेऊन मिळकतीवर लिहुन देणार यांचेतर्फे जर शेती किंवा अन्य लागवड केली असल्यास लिहुन देणार हे सदर मिळकतीवरील करण्यात आलेली शेती किंवा अन्य लागवड तसेच सदरहू मिळकतीवर असलेली घरे व अन्य बांधकामे स्वखर्चाने काढुन देऊन (तसे लिहून देणार यांनी न केल्यास लिहुन घेणार यांना सदरहू शेती किंवा अन्य लागवड वा घरे/बांधकामे काढुन घेण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे व राहील) लिहून घेणार यांना सदरहू मिळकतीचा कब्जा खुला, मोकळा व निर्विवाद असा प्राप्त झाल्यानंतर सदरहू मिळकत व इतर मिळकती एकत्रीत करुन एमएमआरडीए कडुन/संबंधीत नगररचना विभागाकडुन आराखडा मंजुर करण्यात येईल तसेच मिळकतीची बीनशेती परवानगी प्राप्त करण्यात येईल.

११. लिहुन देणार यांना मोबदल्या अंतर्गत देण्यात येणारे बांधकाम क्षेत्र कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या फ्लोअर स्पेस इन्डेक्स १.१० (मुळ चटईक्षेत्र निर्देशांक) प्रमाणे मंजुर होणाऱ्या बांधकाम क्षेत्रावर आधारीत आहे व अशा बांधकाम क्षेत्रामध्ये प्रमाणशीर बाल्कनी, फ्लॉवर बेड, नीच, कपाट, टेरेस यांचा समावेश सदनिकेत असेल तसेच म्हाडा किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) चे नियमा अंतर्गत विकास आराखडा व बांधकाम मंजूरी प्राप्त करण्यात येईल. सदरहू इमारतीत एमएमआरडीएने वा तत्सम विकास प्राधिकारणाने/नगररचना विभागाने मंजुर केलेल्या ऑफीस, गॅरेज अशा व एमएमआरडी प्राधिकरणास किंवा म्हाडा किंवा अन्य नगररचना विभागास प्रिमियम भरुन मिळणाऱ्या वाढिव बांधकाम क्षेत्राचा सदरहू वास्तुस्वरुपी मोबदल्यात समावेश राहाणार नाही व अशा सर्व सुविधांचा व वाढीव बांधकाम क्षेत्राचा उपभोग व विनियोग करण्याचा हक्क व अधिकार फक्त लिहुन घेणार यांनाच असेल व राहील व वास्तूस्वरुपी मोबदल्यात ज्या सुखसोई देण्याच्या आहेत त्या अन्य सदनिका/गाळे धारकांप्रमाणेच असतील व राहतील.

१२. जर ठरलेल्या मुदतीत देय बांधकाम लिहुन घेणार यांनी न दिल्यास लिहुन घेणार हे लिहुन देणार यांना रक्कम रू. २,००,०००/– (अक्षरी रूपये दोन लाख मात्र) प्रति वर्षी देतील तसेच ठरलेल्या मुदतीत लिहुन देणार यांनी टायटल व कब्जेवहिवाटी संबंधी हरकतींचे निराकण करून न केल्यास किंवा असमर्थ ठरल्यास लिहुन देणार जमिन मालक हे लिहुन घेणार विकासक यांना रक्कम रू. २,००,०००/– (अक्षरी रूपये दोन लाख मात्र) प्रति वर्षी देतील व हे उभय पक्षीय यांना मान्य व कबुल आहे व भविष्यात देखील राहील.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 KALYAN-2

१३. उभयपक्षांत असे ठरले आहे की, वर उल्लेख केल्याप्रमाणे लिहुन देणार यांना वास्तुस्वरुपी मोबदल्या अंतर्गत प्राप्त होणार आहे त्यापैकी जे क्षेत्र लिहून देणार मालक हे स्वतःच्या वापराकरिता ठेवतील त्यांकरीता लागणारा विज मिटर, पाणी कनेक्शन, सोसायटी संबंधीत खर्च, इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस, कॉप्रस फंड, क्लब हाऊस चार्जेस, ट्रान्सफॉर्मर चार्जेस, सोलार इक्वीपमेंट चार्जेस, सेवरेज ट्रिटमेंट प्लान्ट, रेन वॉटर हारवेस्टींग, बोअरवेल चार्जेस व तत्सम अनुषंगीक खर्च व देय तसेच सोसायटी स्थापन

क.ल.न. २
दस्त क्र. ६६३५ २०२४
१५

करण्याचा खर्च, भाग भांडवल, इतर कर व देय लिहून घेणार विकासक यांनी करण्याचा व सोसण्याचा आहे परंतु ज्या सदनिका/गाळे लिहुन देणार मालक हे नॉमिनीज/भावी खरेदीदाराना विकतील त्या नॉमिनीज/भावी खरेदीदार यांना वरील सर्व कर व देय भरण्याचे व सोसण्याचा आहेत. या व्यतीरिक्त वास्तूस्वरुपी मोबदल्याकरीता करण्यात येणाऱ्या कराराचा खर्च म्हणजे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर अनुषंगीक खर्च लिहून देणार मालक किंवा त्यांचे नॉमिनीज यांनीच करण्याचा व सोसण्याचा आहे. उभयपक्षांत असे ठरले आहे की, सदरहू व्यवहाराअंतर्गत व सदरहू करारात नमुद केलेल्या वास्तुस्वरुपी मोबदल्या करीता कायद्या अंतर्गत सर्व्हीस टॅक्स, व्हॅल्यू ॲडेड टॅक्स जीएसटी व त्या व्यतिरिक्त कोणताही नवा कर भरण्याची मागणी शासनाने केल्यास, असे देय असलेले कर लिहून देणार मालक हे स्वत: भरतील आणि/अथवा लिहून घेणार विकासक यांच्याकडे जमा करतील व त्याची तोशिस लिहून घेणार विकासक यांना लागू देणार नाहीत.

१४. उभय पक्षांत असे ठरले आहे की, जो वास्तुस्वरुपी मोबदला लिहून देणार यांना सदरहू करारा अंतर्गत प्राप्त होणार आहे अशा वास्तुस्वरुपी मोबदल्याचा ताबा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना सदरहू मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर व संबंधीत नगर रचना विभागाकडुन बांधकाम पुर्णतेचा दाखला प्राप्त केल्यानंतर देण्याचा आहे त्याकरीता लिहून घेणार हे लिहून देणार यांना त्या संबंधीचे लेखी पत्र पाठवतील व असे पत्र लिहून देणार यांना प्राप्त झाल्यापासुन १५ दिवसाच्या कालावधीत लिहून देणार यांनी सदरहू वास्तुस्वरुपी मोबदल्याचा ताबा न घेतल्यास, लिहून घेणार यांना लिहून देणार यांना देण्यात येणाऱ्या सदनिका सोडुन अन्य गाळे/सदनिकांचा ताबा संबंधीत खरेदीदारांना देण्याचे पुर्ण हक्क व अधिकार आहे व राहतील हे लिहून देणार यांना मान्य व कबुल आहे.

१५. उभयपक्षांत असे ठरले आहे की, लिहून देणार यांना देण्यात आलेली/येणारी अनामत रक्कम लिहून देणार हे लिहून घेणार यांना वास्तुस्वरुपी मोबदल्याचा ताबा घेतेवेळी प्रमाणशीर स्वरुपात परत करण्याची आहे व तरी वर नमुद केलेले सर्व चार्जेस, खर्च व रक्कम तसेच अनामत रक्कम लिहुन देणार यांनी काही कारणास्तव लिहुन घेणार यांना देण्यास हयगय व टाळाटाळ केल्यास अशा एकदरीत रक्कमेपोटी लिहुन घेणार हे सदनिकेकरीता प्रचलित बाजारभावाप्रमाणे लिहुन देणार यांना प्राप्त होणाऱ्या वास्तुस्वरुपी मोबदल्यातुन क्षेत्र/सदनिका कमी करतील व असे कमी करण्यात आलेल्या क्षेत्रांत/सदनिकांत लिहुन देणार यांना कोणताही हक्क व अधिकार राहणार नाही व असा कमी झालेला वास्तुस्वरुपी मोबदला/सदनिका लिहुन घेणार यांनी खुल्या बाजारात त्यांच्या परीने त्यांच्या मर्जीच्या खरेदीदारांस विकण्याचा व मोबदला स्विकारण्याचा व त्याचा विनियोग करण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असेल व राहील.

१६. उभय पक्षांत असे ठरले आहे की, लिहून देणार हे जो वास्तुस्वरुपी मोबदला त्यांच्या भावी खरेदीदारांना विकतील अशा करारात लिहून घेणार हे प्रमोटर या नात्याने सामिल होतील व सदरहू करार त्रिपक्षीय करार राहील व अशा करारात लिहून देणार हे सदनिकेचा संपुर्ण मोबदला स्विकारतील व लिहून घेणार हे वीज मिटर, पाणी कनेक्शन,

कलन २
दस्त क्र. ६७२४ २०२४
९६ ७६

बाल्कनी बंदीस्त खर्च, इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस, कॉर्पस फंड, क्लब हाऊस चार्जेस, ट्रान्सफॉर्मर चार्जेस, सोलार इक्वीपमेंट चार्जेस, सिवरेज ट्रिटमेंट प्लान्ट, रेन वॉटर हारवेस्टींग, बोअरवेल चार्जेस व तत्सम अनुषंगीक खर्च व देय तसेच सोसायटी स्थापन करण्याचा खर्च, भाग भांडवल, इतर कर व देय यांच्या रक्कम संबंधीत सदनिका खरेदीदारांकडुन स्विकारतील व त्या संबंधीची तजवीज संबंधीत करारात करण्यात येईल व सदनिकेचा कब्जा लिहून घेणार हेच भावी खरेदीदारांना देतील.

१७. उभयपक्षांत असे ठरले आहे की, सदरहू मिळकतीच्या कराराअंतर्गत जो मोबदला लिहून देणार यांना प्राप्त होणार आहे त्या अनुषंगाने लिहून देणार यांना आयकर कायद्या अंतर्गत होणाऱ्या कॅपिटल गेन टॅक्स व इतर अन्य कर भरावे लागणार आहेत ते सर्व भरण्याची जबाबदारी लिहून देणार यांचीच आहे व राहील.

१८. लिहून देणार यांनी त्यांच्या मिळकतीत असलेल्या हिश्श्याप्रमाणे व कुटूंबात झालेल्या समझोत्या अंतर्गत वर ठरलेली रक्कम त्यांच्या कुटुंबाच्या वतीने एकत्रीतपणे स्विकारतील व त्याप्रमाणे प्राप्त होण्याच्या लिखित सूचना लिहून देणार हे लिहून घेणार यांना देतील व त्याप्रमाणे मोबदला लिहून देणार यांनी दिलेल्या लेखी सुचने अंतर्गत सदर व्यक्तींनी वास्तुस्वरुपी मोबदला व रक्कम स्विकारल्यास, व सदर मोबदल्यातील सदनिकां त्यांच्या मर्जीप्रमाणे भावी खरेदीदारांस विकल्यास व त्यांच्याबरोबर करार मदार केल्यास, मोबदला स्विकारल्यास तसेच सदर वास्तुस्वरुपी मोबदल्याचे स्वरुप बदलल्यास व मोबदला स्विकारुन त्याच्या पोचपावत्या लिहून घेणार यांस दिल्यास ते सर्व लिहुन देणार यांच्यावर कायदेशीररीत्या बंधनकारक असतील व राहतील व स्विकारलेली अनामत परत करण्याची जबाबदारीही लिहुन देणार यांचीच आहे व राहील व अशी सुचना व माहीती लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेली आहे व त्याप्रमाणे लिहून घेणार वर ठरलेला मोबदला या कराराप्रमाणे व परिशिष्टात नमुद केल्याप्रमाणे देण्यास बांधील आहेत परंतू लिहून देणार यांचे आपसांत सदर मोबदल्या संबंधी कोणताही मतभेद, तक्रार व वाद उपस्थीत झाल्यास त्याचे निवारण लिहून देणार हे स्वखर्चाने त्यांच्या कुटूंबियांत संयुक्तरित्या करुन घेतील व त्याची तोषीस लिहून घेणार यांना लागू देणार नाहीत व त्या कारणाने लिहून घेणार सदरहू मिळकतीवर राबविणार असलेल्या विकसन कार्यात कोणताही अडथळा करणार नाहीत व हरकत घेणार नाही अशी स्पष्ट ग्वाही लिहून देणार हे या कराराने लिहून घेणार यांना देत आहेत.

१९. या कराराअंतर्गत लिहून देणार संयुक्तरित्या जाहिर व उदघोषित करतात की ते येणे प्रमाणे:-

अ) सदरहू मिळकतीसंदर्भात त्यांनी आजपर्यत इतर कोणाबरोबरही कुठल्याही प्रकाराचा करार, वंचनचिठ्ठी, ताबा, गहाण व इतर कागदपत्रे कुणाच्याही लाभात लिहून दिली नाही व सदरची मिळकत चोख, निर्विवाद व बोजाविरहीत सर्व ऋणबोजेमुक्त अशी आहे व जरूर पडल्यास मिळकतीच्या महसुल अधिकार अभिलेखात मयतांची नावे कमी करुन त्यांच्या वारसांची नावे दाखल करुन घेतील व त्याकरीता कायद्यातील तरतुदींची पुर्तता करतील.

क.ल.न. २
दस्त क्र. ६६३९/२०२४
१८ / ६६

इ) सदरहू मिळकती संदर्भात ॲक्वीझीशन अथवा रिक्वीझीशन संबंधी कुठल्याही प्रकारच्या नोटीसा आजतागायत लिहून देणार यांना मिळालेल्या नाहीत व सदरहू मिळकतीवर लिहून देणार यांची निरंतर कब्जावहिवाट आहे.

ई) सदरहू मिळकतीच्या संदर्भात लिहून देणार यांच्या तर्फे वाद निर्माण झाल्यास सदरहू वाद, तंटा, दावा स्वखर्चाने सोडवून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून देणार यांची राहिल. तसेच यदाकदाचीत सदरहू मिळकतीसंबंधी कोणीही वारसा हक्काबाबत किंवा ताब्याबाबत कायदेशीर हिल्ला हरकत घेतल्यास त्याचेही निवारण लिहून देणार यांनी स्वखर्चाने करावयाचे आहे व या गोष्टींचे निराकरण होईपर्यंत लिहून देणार यांना करारात नमूद केलेला वास्तुस्वरुपी मोबदला मागण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. तसेच सदरहू हक्क हितसंबंधाचे निराकरण करण्यासाठी कोणतीही रक्कम देय झाल्यास सदरहू रक्कम लिहून देणार यांस देय असलेल्या वास्तुस्वरुपी मोबदल्यातुन वळती करून घेतली जाईल व तशी रक्कम लिहून देणार यांस मिळाल्याचे गृहीत धरण्यात येईल हे लिहून देणार यांस मान्य व कबूल आहे. बांधकाम करण्यास यामुळे कोणताही अडथळा व दिरंगाई कारणीभुत झाल्यास वास्तुस्वरुपी मोबदला देण्यास लागणाऱ्या समय सीमेत वाढ करण्यात येईल.

उ) सदरहू मिळकतीचा सारा, कर लिहून देणार यांनी या करारा पर्यंत भरलेला आहे.

ऊ) सदरहू मिळकतीत जाण्यायेण्यासाठी व वहिवाटीसाठी योग्य व रास्त असा रस्ता आहे परंतु असा रस्ता सद्यस्थीतीत अस्तीत्वात नाही तरी सदरहू मिळकतीकरीता सद्यस्थीतीत लिहून देणार हे रस्ता मिळवुन देतील व अशा रस्त्याचे वहिवाट करण्याचे हक्क लिहून देणार यांनी लिहून घेणार यांस दिलेले आहेत तरी सदर रस्ता संबंधीत जमीनींच्यां मालकांकडुन प्राप्त होण्याकरीता लिहून देणार हे लिहून घेणार यांना संपुर्ण सहकार्य करतील.

ए) लिहून देणार हे सदरहू मिळकतीचा ठरलेला संपुर्ण मोबदला प्राप्त झाल्यानंतर लिहून घेणार किंवा ते सांगतील त्या व्यक्ती/संस्थेच्या लाभात फरोक्तखत करार व अनुषंगिक लेखटेक लिहून व नोंदवुन देतील व त्यावेळेस सदरहू मिळकतीत हक्क, हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींच्या/वारसांच्या सहया, संमत्या, जाबजबाब इत्यादी मिळवुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहुन देणार यांची आहे व राहील किंवा सदरहु मिळकतीबाबत लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना दिलेल्या कुलमुखत्यारपत्राच्या आधारे लिहुन घेणार यांनी सदरहु मिळकतीचे अंतिम फरोक्तखत लिहुन घेणार यांच्या स्वतःच्या नावे किंवा त्यांच्या नॉमिनज/असायनीजच्या नावे लिहुन घेण्याचा आहे त्यावर लिहुन देणार यांचे वतीने कुलमुखत्यारी म्हणुन सही करण्याची आहे व असे फरोक्तखत संबंधित दुय्यम निबंधक कार्यालयात हजर करून त्याबाबत लिहुन देणार यांचे कुलमुखत्यारी म्हणुन त्यांचे वतीने जबजबाब देवुन सहया व कबुली द्यायच्या आहे व सदरहु मिळकतीचे अंतिम फरोक्तखत नोंदणी करून घेण्याचे आहे, त्यास लिहुन देणार यांची कोणतीही हरकत असणार नाही.

JOINT SUB-REGISTRAR CLASS
क.ल.न.२
दस्त क्र. ६७३५/२०२४
९८ / ७६

२०. उभय पक्षांत असे ठरले आहे की, सद्यस्थितीत सदरहू मिळकत ही कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत/कार्यक्षेत्रात समाविष्ट असुन मिळकतीवर कोणतेही आरक्षण नाही परंतु शासनाने सदर गावाकरीता काही शहर सदृष्य तरतुदी लागू केल्यास त्यामुळे सदरहू मिळकतीस विशिष्ट लाभ/फायदा मिळाल्यास अथवा सदरहू मिळकत वा त्यातील काही भाग आरक्षणाने बाधीत झाला तर, असे बाधीत होणाऱ्या क्षेत्रासंबंधी जरूर ती योग्य ती कारवाई करणे, संबंधीत कार्यालयात आरक्षणा विषयी बोलणी करण्याचा, तडजोड करणे, म्हणणे मांडणे, आरक्षण उठविणे, स्थलांतर करणे व योग्य निर्णय घेण्याचा, करार मदार, लेखटेक व ताबा पावती लिहून देण्याचे व प्राप्त होणारे लाभ/फायदे अथवा तोटे स्विकारण्याचा अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना या करारान्वये दिलेले आहेत. कल्याण डोंबिवली महानगरपालिका आणि/अथवा राज्य सरकारने किंवा म्हाडा किंवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने निर्देशित केलेल्या नगर रचना विभाग यांचे नियमा अंतर्गत एफएसआय १.१० प्रमाणे ग्राहय धरून दिलेला आहे तसेच सदरहू मिळकतीपैकी जे क्षेत्र आरक्षणाने बाधीत होत असेल व त्यावर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने कायद्याच्या तरतुदी अंतर्गत कोणतीही कार्यवाही आणि/अथवा हस्तांतरणीय प्रक्रीया आणली नाही तर लिहून देणार यांच्या वतीने लिहून घेणार यांस सदर आरक्षणाच्या संबंधाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस परचेस नोटीस देण्याचा व त्या अनुषंगाने तरतुदींचे पालन करुन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडुन प्रचलित नियमाप्रमाणे मोबदला व अनुषंगीक लाभ, फायदे घेण्याचे हक्क आहेत व त्याकरीता लिहून देणार यांनी लिहून घेणार यांस सर्व अधिकार बहाल केले आहेत.

२१. सदरहु मिळकतीच्या टायटल बाबत तसेच कब्जाबाबत लिहुन देणार यांच्या तर्फे कोणीही वाद निर्माण केल्यास त्याचे निराकरण लिहुन देणार हे स्वखर्चाने करून देतील व लिहून घेणार यांना सदरहू मिळकत योग्यरित्या विकसीत करता यावी त्या योजनेसाठी जरूर ते कागदपत्र अस्सल नकला व माहिती वगैरे लिहून देणार यांनी द्यावयाची आहे. तसेच जे जे कागदपत्र मिळणार नाहीत ते ते मिळविण्यासाठी लिहून देणार यांनी सहया वगैरे दऊन सहकार्य करावयाचे आहे.

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR KALYAN-2
क.ल.न.२
दस्त क्र. ६७३ २०२४
९२

२२. लिहून देणार यांनी संयुक्तरित्या लिहून घेणार यांस सदरहू मिळकतीचा निर्विवाद कब्जा कराराच्या आंशीक पुर्ततेकरीता तात्पुरता दिलेला आहे व लिहून घेणार यांना जागेवर जाण्यायेण्याचे व सदरहू मिळकतींची प्रायव्हेट सर्व्हेअर अगर सरकारी कार्यालयाकडून आखणी व मोजणी करण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे तसेच सदरहू मिळकतीस प्रथम पक्षीय यांना कुंपण किंवा कुंपणाची भिंत घालण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे व अशी मोजणी करतांना किंवा कुंपणाची भिंत बांधतांना काही कायदेशीर अडचणी किंवा तक्रारी आल्यास किंवा अशा अडचणी किंवा तक्रारी बाबतची नोटीस प्रथम पक्षीय यांस मिळाल्यास द्वीतीय पक्षीय त्या ताबोडतोब स्वखर्चाने दूर करतील व त्याची तोशीस प्रथम पक्षीय यांस लागू देणार नाहीत. सदरहू मिळकत विकसित करण्याचे व विकसन कार्य पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्या जागेवर त्यांचे प्रतिनिधी अभियंता,

वास्तूशिल्पकार, कायदेशीर सल्लागार वगैरे तसेच आर्थिक मदत करणारे प्रतिनिधी मित्र, आप्त नातलग यांना वेळोवेळी जागेवर आणण्याचा व जागेवर विकसनाचे कार्य राबविण्याचा पूर्ण हक्क आहे व राहील त्यास लिहून देणार यांनी कोणतीही हरकत घेण्याची नाही.

२३. सदरहू मिळकतीवर लिहून घेणार यांच्या नांवाचा बांधकाम योजना दर्शविणारा नामफलक लावण्याचा हक्क लिहून घेणार यांस लिहून देणार यांनी दिला आहे. तसेच लिहून घेणार हे सदर बांधकाम योजने अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या निवासी सदनिका व व्यावसायिक गाळयांची (लिहून देणार यांना देण्यात येणारे बांधकाम क्षेत्र वगळुन) विक्री करण्याचा तसेच विक्रीची किंमत घेण्याचा विल्हेवाट लावण्याचा पूर्ण हक्क व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिला आहे त्यासंबंधी होणाऱ्या व्यवहारा अंतर्गत लिहून देणार हे कोणत्याही प्रकारची हरकत घेणार नाहीत.

२४. सदरहु मिळकतीवर संबंधीत नगररचना विभागाकडुन प्लॅन पास करून घेण्याचा, त्यात फेरबदल सुधारणा दुरूस्ती करावी लागल्यास त्या दुरूस्तीचा फेरबदलाचा नकाशा तयार करून तो सुधारीत नकाशा मंजूर करून व सुधारीत बांधकाम परवानगी घेण्याचा हक्क आहे तसेच सदरहू मिळकत ही लगतच्या मिळकतीबरोबर एकत्रित करून अशा एकत्रित मिळकतीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिका अथवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडुन/स्थानिक प्रशासनाकडुन मिळकत विकसीत करण्याच्या दृष्टीने आराखडा मंजूर करून घेण्याचा हक्क लिहून घेणार यांना आहे. सदरच्या मिळकतीतून दुसऱ्या लगतच्या मिळकतीसाठी योग्य व रास्त रस्ता देण्याचे हक्क लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना या करारान्वये दिलेले आहेत. सक्षम विकास प्राधिकरणाने सदरहू मिळकती संबंधी स्टेअरकेस एफएसआय व अन्य वाढीव एफ.एस.आय, हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर केल्यास प्रिमियम भरून लिहून घेणार यांनी तसा वाढीव एफएसआय वापरण्याचा आहे व अशा एफएसआय/टि.डी.आर. मध्ये लिहून देणार यांना कोणत्याही प्रकारचा लाभ प्राप्त होणार नाही.

२५. बांधकाम योजना मंजूर होताच ठेकेदार, बिल्डर्स, डेव्हलपर्स वगैरे नेमून योजना लिहून घेणार यांस पूर्ण करण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारे योजना पूर्ण करण्यासाठी लिहून घेणार यांस जागेचे भूखंड पाडून कामाची विभागणी करण्याचा व त्यासाठी व्यक्ती, संस्था वगैरे यांचेबरोबर वेगवेगळे करार मदार लेख करण्याचा पूर्ण हक्क आहे. त्यावेळी जमिन मालक या नात्याने लिहून देणार यांच्या सहया करण्याची जरूरी लागल्यास लिहून देणार यांनी बिनातक्रार, बिनबोभाट, शांततेने विना मोबदला सहया करण्याच्या आहेत व तसे लिहून देणार हे सहया देण्याचे कबूल करीत आहेत.

२६. वरील जागेवरील बांधकाम पूर्ण झाल्यावर व कल्याण डोंबिवली महानगरपालिका अथवा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडुन/स्थानिक प्रशासनाकडुन वापर परवाना मिळाल्यानंतर व बांधकामा मधील सर्व गाळे धारकांची सहकारी गृहनिर्माण संस्था आणि

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-2 KALYAN-2
सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कल्याण
कार्यालय क्र. २

कलन.२
दस्त क्र. ६७३४ २०२४
२० ७६